| | | | |
|---|---|---|---|
| **MHST090011252023** | दाखल दिनांक | : | २५-०७-२०२३ |
| | नोंदणी दिनांक | : | २५-०७-२०२३ |
| | निकाल दिनांक | : | १७-१०-२०२४ |
| | कालावधी | : | व. म. दि. |
| | | | ०१ ०२ २३ |
| CNR. No.MHST090011252023 | | | |

नियमित फौजदारी खटला क्रमांक – १९३/२०२३ निशाणी क्रमांक –

(न्यायनिर्णय)

| | | |
|---|---|---|
| कोरेगांव येथील न्यादंडाधिकारी प्रथमवर्ग, न्यायालय क्रमांक १, ता. कोरेगांव, जि. सातारा.<br>( पिठासण अधिकारी – चंद्रशिला शिवाजी पाटील)<br>(१७/१०/२०२४)<br>(नियमित फौजदारी खटला क्रमांक १९३/२०२३) | | |
| (भारतीय दंड संहिता कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, ५१०) | | |
| अभियोगपक्ष | | **महाराष्ट्र शासन तर्फे**<br>वाठार पोलीस स्टेशन, ता. कोरेगांव जि. सातारा. |
| अभियोगपक्षातर्फे अभियोक्ता | | **श्री. एस. आय. सावंत** |
| आरोपी | | **सोमनाथ दत्तू कदम**<br>वय – ४१ वर्षे, धंदा – मजूरी<br>रा. देऊर ता. कोरेगांव, जि. सातारा. |
| आरोपीतर्फे विधीज्ञ | | **श्री. आर. सी. शिंदे** |

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | | ०५/०५/२०२३ |
| तक्रार दाखल दिनांक | | ०६/०५/२०२३ |
| पुरावा सुरू झाल्याचा दिनांक | | १५/१०/२०२४ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | | निरंक |
| न्यायनिर्णय दिनांक | | १७/१०/२०२४ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंर्दभात आदेशाचा दिनांक | | **निरंक** |

## आरोपीची माहिती

| आरोपी क्रमांक | नाव | अटकेचा दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ. प्र. सं. कलम ४२८ अन्वये समायोजित करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **सोमनाथ दत्तू कदम** | – | फौजदारी प्रक्रिया संहिता ४१(अ) प्रमाणे नोटीस दिली. | **भारतीय दंड संहिता कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, ५१०** | निर्दोष मुक्तता करण्यात आली. | निरंक | निरंक |

**सरकारपक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार /बचावपक्षातर्फे साक्षीदार/ न्यायालयीन साक्षीदार**

**अ. अभियोगपक्ष**

| सा. क्र. | साक्षीदाराचे नाव | स्वरुप | निशाणी क्र. |
|---|---|---|---|
| १. | शितल सोमनाथ कदम | फिर्यादी | ११ |

**क. न्यायालयामार्फत निशाणी ( फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा )**

| अ. क्र. | निशाणी | वर्णन |
|---|---|---|
| | | निरंक |

**न्यायनिर्णय**

**(घोषित दिनांक १७/१०/२०२४)**

प्रस्तुत खटला आरोपी विरूध्द भारतीय दंड संहिता कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, ५१० खालील अपराधाकरीता चालविण्यात आला.

**अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे –**

२] तक्रारदार सौ शितल सोमनाथ कदम रा. देऊर ता कोरेगाव जि सातारा या ठिकाणी त्यांचे पती सोमनाथ कदम, मुलगी सिया, मुलगा वेदांत असे एकत्र राहणेस आहेत. गावी तक्रारदारला घर व जमीन आहे. तक्रारदारचे पती सोमनाथ दत्तु कदम हे आर्मी खात्यात नोकरीस होते सध्या ते सेवानिवृत्त झालेने घरीच असतात. दिनांक ०५/०५/२०२३ रोजी रात्रौ १०.३० वा. चे सुमारास तक्रारदार व तक्रारदारची मुले जेवणखान करुन बसले होते. त्यावेळी तक्रारदारचे

पती हे बाहेरूनच जेवन करुन आले होते व त्यांनी दारु पिलेली होती. तक्रारदार पती यांनी तक्रारदारला विचारले की, ''तु माझे पाकिटातील पैसे घेतलेस का ?'' त्यावर तक्रारदारने तिच्या पतीला म्हणाली की, ''सकाळी सिया हिला मँगी खायची होती म्हणुन मी फक्त ३० रु पाकीटामधुन घेतले होते.'' असे सांगितलेवर आरोपीने तक्रारदारला शिवीगाळ करणेस सुरुवात केली व म्हणाले की '' मला न विचारता माझ्या पाकीटामधुन पैसे का घेतलेस'' असे म्हणुन तक्रारदारला हाताने व लाथाबुक्क्यांनी मारहाण करणेस सुरुवात केली व तक्रारदारच्या हाताला धरुन तक्रारदारला '' घरातुन निघुन जा'' असे म्हणुन घरातुन बाहेर काढले म्हणुन तक्रारदारने तिला अजुन जास्त मारहाण करतील या भितीने तक्रारदार रस्त्याने त्यांचे घराजवळ असलेल्या शेताकडे निघाल्या. त्यावेळी आरोपी तक्रारदारच्या पाठीमागे येवु लागले. तक्रारदार देऊर येथील रेल्वे रुळाजवळ गेल्या. त्याठिकाणी आरोपीने तक्रारदारला शिवीगाळ करुन शेतातील ऊस काढुन घेवुन त्या ऊसाने मारहाण करणेस सुरुवात केली. आरोपी तक्रारदारला म्हणाले की '' तु रेल्वे खाली जिव दे'' असे म्हणुन त्यांनी तक्रारदारला रेल्वे रुळावरील पडलेला दगड हातात घेवुन तक्रारदारच्या पायावर मारला. तक्रारदारला मारहाण करीत असलेने मोठमोठ्याने आरडाओरडा करुन '' मला त्रास देवु नका'' असे म्हणत होत्या तरी देखील आरोपी मारहाण करीत राहीले. त्यानंतर आरोपीने तक्रारदारला '' जिवे मारुन टाकुन रेल्वे खाली फेकुन देईल'' अशी धमकी दिली. त्यानंतर त्याठिकाणी त्यांचे गावातील पोलीस पाटील अजित पाटील हे आले व त्यांनी तक्रारदार व आरोपीची भांडणे सोडवुन आरोपीला समजावुन सांगुन त्यांना घरी जा असे सांगितलेने तक्रारदार व आरोपी घरी निघुन आले. सदर झालेल्या मारहाणीत तक्रारदारला तिच्या पायावर ,हातावर ,पाठीवर ,मांडीवर मुका मार लागला होता. तसेच झाले मारहाणीबाबत तक्रारदारने तिची आई शैला काशिनाथ धुमाळ रा. सोनके ता कोरेगाव, मावशी- शोभा श्रीरंग पवार रा पवारवाडी वाल्हे ता पुरंदर जि पुणे यांना फोनवरुन मारहाणीबाबत सांगितले आहे. तक्रारदारची आई तक्रारदारला घेणेसाठी तक्रारदारचे घरी आज रोजी आल्या व तक्रारदारने त्यांच्या बरोबर चर्चा करुन पोलीस स्टेशन येथे तक्रार दिली.

३] सदर तक्रारीवरून आरोपींविरूध्द् गुन्हा क्रमांक ३१/२०२३ अन्वये गुन्हयाची नोंद करण्यात आली. सदर गुन्हयाचा तपास तपासी अधिकारी श्री. एम. एम. बोडके यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी घटनास्थळाचा पंचनामा केला. साक्षीदारांचे टिपण घेतले. गुन्हयाचा तपास पुर्ण करून आरोपींविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र पाठविले.

४] आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान कलम, १८६० चे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, ५१० अन्वये दोषारोप (नि.७) निश्चित केला. आरोपींनी गुन्हा मान्य व कबुल नसल्याचे सांगुन खटला चालविणेची मागणी केली.

५] अभियोगपक्षाचे पुराव्यात आरोपींविरुध्द गुन्हादर्शक सामग्री न आल्याने फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ नुसार त्यांचे निवेदन नोंदविण्यात आले नाही. तसा आदेश नि.१ वर पारीत करण्यात आला.

६] अभियोगपक्षातर्फे विधिज्ञ श्री. एस. आय. सावंत यांचा युक्तिवाद ऐकला. आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. आर. सी. शिंदे यांचा युक्तिवाद ऐकला. न्यायनिर्णयासाठी खालील मुद्दे माझे विवेचनास उत्पन्न होतात, त्याचा निष्कर्ष व कारणमिमांसा मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | विचारार्थ मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने हे शाबीत केले आहे का की,दि. ०५/०५/२०२३ रोजी रात्री १०.३० वा. सुमारास मौजे देऊर ते बिचुकले जाणारे कच्च्या रोडवर रेल्वे रुळाजवळ तसेच फिर्यादी व आरोपीचे राहते घरात ता. कोरेगांव गावचे हद्दीत आरोपीने दारू पिवून '' फिर्यादी यांनी आरोपीच्या पाकीटातील पैसे न विचारता घेतलेच्या कारणावरून फिर्यादीस लाथाबुक्यांनी मारहाण केली. तसेच देऊर | **नाही.** |

| | | |
|---|---|---|
| | ते बिचुकले जाणारे कच्च्या रोडनेजात असताना रेल्वे रुळाजवळ आरोपीने फिर्यादीच्या पाठीमागे जावून ऊसाने व दगडाने मारहाण केली व जीवे मारुन टाकून रेल्वेखाली फेकून देईन अशी धमकी दिली ? | |
| २. | अभियोगपक्षाने हे शाबीत केले आहे का की, उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीस मारहाण करुन इच्छापुर्वक दुखापत केली ? | **नाही.** |
| ३. | अभियोगपक्षाने हे शाबीत केले आहे का की, उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी तुम्ही फिर्यादीस शिवीगाळ करुन सार्वजनिक ठिकाणी शांततेचा भंग करण्यास प्रवृत्त केले ? | **नाही.** |
| ४. | अभियोगपक्षाने हे शाबीत केले आहे का की, उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी तुम्ही फिर्यादीस दमदाटी करुन फौजदारीपात्र धाकदडपशाचा अपराध केला ? | **नाही.** |
| ५. | अभियोगपक्षाने हे शाबीत केले आहे का की, उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी तुम्ही दारुच्या नशेच्या अंमलाखाली फिर्यादीस शिवीगाळ करुन गैरवर्तणूक केली ? | **नाही.** |
| ६. | आदेश काय ? | **आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते.** |

## कारणमिमांसा

**मुद्दे क्र.१ ते ५ करीता–**

७] उपरोक्त सर्व मुद्दे हे एकमेकांशी निगडीत असल्याने, त्यासाठी करावे लागणारे

विवेचनाची पुनरावृत्ती टाळण्यासाठी ते विश्लेषणासाठी एकत्रित विचारात घेतले आहेत. अभियोगपक्षाने आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी तक्रारदार शितल सोमनाथ कदम (साक्षीदार नं.१) यांना निशाणी ११ वर तपासले आहे. साक्षीदार क्र. १ आरोपी त्यांचे पती आहेत. त्यांच्याबरोबर केवळ शाब्दिक वादावादी झाली होती याव्यतिरिक्त काहीही घडले नसल्याचे कथन केले आहे. तक्रारदार साक्षीदार यांनी अभियोगपक्षास उपयुक्त अशी साक्ष दिली नाही, म्हणून सरकारी पक्षाने न्यायालयाची परवानगी घेवून साक्षीदारांना उत्तरसूचक प्रश्न विचारले असता, त्यामधून सरकारी पक्षाचे कथनाला मदत करणारा असा कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. फिर्यादीने फिर्यादीमध्ये आरोपीने तिला मारहाण तसेच शिवीगाळ केली असे सांगितले असले तरी देखील सदर आरोपी मारहाण व शिवीगाळ केल्याबाबत अवाक्षरही काढल्याचे दिसून येत नाही. तसेच तसा मजकूर देखील पुराव्यामध्ये दिसून येत नाही.

८] तक्रारदार अभियोगपक्षाचे कथनांप्रमाणे साक्ष देत नाहीत. तक्रारदार व आरोपी यांचेत तडजोड झाली असून, त्याबाबतची तडजोड पुरशीस त्यांच्या सहीनिशी नि. ०९ दाखल केली आहे. एकंदरीत पुराव्यावरुन असे दिसून येते की, तक्रारदार व आरोपी यांची तडजोड झाली असल्यामुळे तक्रारदार अभियोगपक्षाला समर्थन करत नाही. अशा परिस्थितीमध्ये आरोपीने दारु पिवून तक्रारदारला ऊसाने, लाथाबुक्यांनी व हाताने मारहाण करुन दुखापत केली व तक्रारदारचा अपमान करुन तिच्याकडून सार्वजनीक शांततेचा भंग व्हावा किंवा अन्य कोणताही अपराध घडावा या उद्देशाने प्रक्षोभित करुन फौजदारीपात्र धाकदपटशा करुन त्याला जीवे मारण्याची धमकी दिली, या सर्व बाबी शाबीत करणेकरीता कोणताही सबळ, थेट किंवा सकृतदर्शनी पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे आरोपीने भारतीय दंड विधान १८६० चे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, ५१० अन्वये अपराध केल्याचे संशयाचे पलीकडे सिध्द होत नाही. सबब, मुद्दे क्र.१ ते ५ चे उत्तर मी नकारार्थी नोंदवित आहे.

९] फिर्यादीच्या साक्षी पुराव्याचे अवलोकन करता त्यांनी परस्पर विरोधी कथन केल्याचे दिसुन येते त्यामुळे सदर साक्षीदाराने न्यायालयासमोर खोटा पुरावा दिल्याच्या विरूध्द खोटी साक्ष दिल्याच्या (परज्युरी) या अपराधासाठी त्याच्याविरूध्द कारवाई करणे उचित ठरते परंतु अभिलेखावरून आणि तक्रारदारच्या साक्षी पुराव्यावरून असे दिसुन येते की, आरोपी व

तक्रारदार तसेच जखमी साक्षीदार यांचेमध्ये तडजोड झाल्याने त्यांनी सदरील परस्पर विरोधी वक्तव्य केलेले आहे. त्यामुळे तशी कोणतीही कार्यवाही करणे संयुक्तिक होणार नाही.

**मुद्दा क्र. ६ बाबत –**

१०] मुद्दे क्र.१ ते ५ चे नकारार्थी निष्कर्ष पाहता आरोपीस सदर गुन्हयातून निर्दोषमुक्त करणे क्रमप्राप्त ठरते. प्रस्तूत प्रकरणातील जप्त मुद्देमाल ऊस व दगड मूल्यहीन असल्याने अपील कालावधीनंतर अपीन न झालेस सदर मुद्देमाल मूल्यहीन असल्याने तो नष्ट करण्यात यावा. एकंदरीत वरील सर्व चर्चेवरून मुद्दा क्र. ६ च्या उत्तरादाखल मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहेः

## आदेश

| | |
|---|---|
| १. | आरोपी **सोमनाथ दत्तू कदम** यांना भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, ५१० अन्वये अपराधातून फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २४८ (१) अन्वये निर्दोषमुक्त करण्यात येते. |
| २. | आरोपीचे वैयक्तिक बंधपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येते. |
| ३. | मा. अपिलीय न्यायालयात या निकालाविरुद्ध अपील दाखल झालेस उपस्थित राहणेसाठी आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७ (अ) प्रमाणे प्रत्येकी र.रु.१५,०००/– चे वैयक्तिक बंधपत्र व जामीनपत्र द्यावे. |
| ४. | प्रस्तूत प्रकरणातील जप्त मुद्देमाल ऊस व दगड मूल्यहीन असल्याने अपील कालावधीनंतर अपीन न झालेस सदर मुद्देमाल मूल्यहीन असल्याने तो नष्ट करण्यात यावा. |
| ५. | संबंधित लिपीक यांना सदर प्रकरणातील तडजोड पुरसीस निशाणी क्र. |

| | |
|---|---|
| | ०९ ही निशाणी क्र. १ सोबत जपून ठेवणेबाबत निर्देष देण्यात येतो |

*(खुल्या न्यायालयात घोषीत केला.)*

कोरेगांव. **(चंद्रशिला शिवाजी पाटील)**

दि. १७/१०/२०२४ प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, कोरेगांव

**<u>प्रमाणपत्र</u>**

असे प्रमाणित करण्यात येते की, वरील न्यायनिर्णय हा मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे बरोबर आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखक | – श्री. एन. डी. खुस्पे |
| न्यायालय | – प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, कोरेगांव |
| न्यायनिर्णय संक्रमित दिनांक | –१७/१०/२०२४ |

लघुलेखक